ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR [illegible]
VOL. 6 | ISSUE 1 | JANUARY-FEBRUARY 2020

9

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal




*Issue Editor :*
**Dr. Laxman Ulgade**

*Associate Editor :*
**Dr. Nandkumar Kumbharikar**

*Editor in Chief*
**Dr Kalyan Gangarde**

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

CHRONICLE OF HUMANITIES & CULTURAL STUDIES (CHCS) ISSN: 2454-5503 Impact Factor: 4.197 (IIJIF)

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded

# CONTENTS


1. गोडसे@गांधी.कॉम नाटकातील गांधी विचार : चिकित्सक अभ्यास 05
   डॉ.गणेश मदनराव शिंदे
2. जातीव्यवस्था नष्ट करण्यात भारतीय संविधानाचे योगदान 09
   सुमेद चापाजी गुंडेराव
3. औसा शहराची ऐतिहासिक ओळख व नगरपरिषदेचा इतिहास 11
   डॉ.संजय संदिपान चव्हाण
4. महात्मा बसवेश्वर यांचे कार्य 13
   डॉ. चव्हाण श्रीहरी दासू
5. प्रदुषणाचे प्रकार : कारणे आणि उपाय 15
   डॉ. बिरादार प्रतिभा रंगराव
6. जागतिकीकरण व आरक्षण धोरण 17
   डॉ.शंकर गड्डमवार
7. पंचायत समिती : आर्थिक पैलूंचे प्रशासकीय विश्लेषण 19
   डॉ.कुंभारीकर नंदकुमार नारायणराव
8. भारतातील सार्वजनिक उपक्रमाची प्रासंगिकता 21
   डॉ.आहेर पी.व्ही.
9. मराठवाडयातील साहित्यीक आणि साहित्यकृती : एक अवलोकन 22
   दत्तात्रय बद्रिनाथ हारकर
10. आर्थिक विकासातील औद्योगिकीकरणाची भूमिका एक अभ्यास 24
    डॉ. मधुकर आघाव
11. भूरुपीय आपत्ती आणि त्यांच्या व्यवस्थापनाचा भौगोलिक अभ्यास 26
    नामदेव मंचा राठोड
12. पर्यावरण संरक्षण व राजकीय ध्येयधोरण 28
    डॉ.विजयकुमार सोन्नर
13. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे लोककल्याणकारी धोरण आणि सद्यस्थिती 31
    डॉ. रमेश वाघमारे, डॉ. सुखलाल राठोड
14. आंतरराष्ट्रीय राजकारणात अलिप्तवादाची भुमिका आणि उपयुक्तता 33
    डॉ.भारत भोपु राठोड
15. वाचन संस्कृती 34
    डॉ. वंदना शेलार
16. दीघनिकायग्रंथातील जाती–व्यवस्थेचे खंडन 36
    डॉ.सारिका विष्णु केदार
17. सत्यशोधक कृष्णराव भालेकर यांची कृषिनिष्ठा 39
    डॉ. शंकर हणमंतराव कल्याणे
18. देगलूर नगरीचा ऐतिहासीक मागोवा 42
    डॉ.सुनेवार किशन रामलू

CHRONICLE OF HUMANITIES & CULTURAL STUDIES (CHCS) ISSN: 2454-5503 Impact Factor: 4.197 (IIJIF)

VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist. Nanded

18.

# देगलूर नगरीचा ऐतिहासीक मागोवा

**डॉ.सुनेवार किशन रामलू**
(इतिहास विभाग प्रमुख)
देगलूर महाविद्यालय देगलूर, ता.देगलूर जि.नांदेड. — ४३१७१७

सध्या देगलूर हे नांदेड जिल्ह्यातील एक महत्वाचे तालुक्याचे ठिकाण आहे. पूर्वी देगलूर तालुका परिसर बरिदशाही काळात महमदाबाद (बिदर) जिल्ह्यात येत होता. त्यानंतर निझामाच्या काळात (इंदूर) जिल्ह्याचा एक भाग बनला. आणि इ.स. १९०५ मध्ये नांदेड जिल्ह्यातील एक तालुका बनविला गेला. देगलूर हे लेंडी (उद्यालिका) नदीच्या तिरावर वसलेले होते व आहे.

जवळपास ३०० वर्षापुर्वी देगलूर चे नाव देवपूर होते असे म्हटले जाते. त्यापासून शब्दाचा उपभ्रंश होत गेला आणि देगलूर हे गाव बनले असावे असे मानले जाते ते असे --

देवपूर ► देवऊर ► देवउलूर ► देगलूर

गतकालीन देगलूर ह्या गावाला चार वेशी होत्या त्या चार दिशांना होत्या त्यात--

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्वेला - | घुम्मट बेस / गुम्बद बेस |
| २. | पश्चिमेला- | हनुमान वेस |
| ३. | दक्षिणेला - | होट्टल बेस |
| ४. | उत्तरेस - | पोचम बेस |

देगलूरच्या भोवताली तटबंदी व वरील चार बेस त्यात होत्या. पण ग्रामविकासात त्या हळू हळू नष्ट झाल्या आहेत.

देगलूरच्या वायव्येस - दिगलवाडी नावाची लहानशी वाडी होती. (रोकडा हनुमान मंदिराच्या पाठीमागील बाजूस) नैऋतेस फुलवाडी होती. तर पश्चिमेस पेठअमरापूर हे खेडे होते. पेठअमरापूर हे खेडे इ.स.१८८९ मध्ये देगलूरात विलीन करण्यात आले होते.

प्रारंभी दिग्गलवाडी नावाची लहानशी वाडी लेंडी नदीच्या काठावर होती. नेहमी पावसाळयात येणाऱ्या पुरामुळे ती वाडी उठून गेली किंवा स्थलांतरित झाली. तेथील बरेच लोक पेठअमरापूरच्या पश्चिमेस येवून स्थाईक झाले असावे. ह्या परिसरावर तेलगु व कन्नड भाषेचा प्रभाव निश्चितच होता कारण येथील बहुतांश लोकांना कन्नड व तेलगू भाषा येते. तेलगुमध्ये वाडीचे ऊर झाले. म्हणजे तेलगु भाषेत गावांना ऊर म्हटले जात होते. त्यानुसार -

दिग्गलवाडी ► दिग्गलऊर ► देगलऊर ► देगलूर

असे झाले असावे व हेच संयुक्तिक वाटते.

**देगलूर - प्राचीन काळ :-**

कल्याणीच्या चालुक्य घराण्याच्या काळात, त्यांच्या साम्राज्यात देगलूर परिसराला अतिशय महत्व होते. कारण देगलूर परिसरात दोन/तीन सामंत कुळे/घराणे होऊन गेले. त्या घराण्यांनी आपापल्या कालखंडात चालुक्यांसाठी भरपूर पराक्रम गाजविले त्यात -

**१. नागवर्म : (इ.स. १०४७) :** तडखेलच्या शिलालेखानुसार नागवर्म कल्याणीचा चालुक्य राजा सोमेश्वर पहिला (इ.स.१०४३-१०६८) चा मांडलिक होता. नागवर्म हा वाजी कुळाचा होता. कल्याणीचा चालूक्य राजा सोमेश्वर - I च्या आदेशान्वये नागवर्मने सेऊण देश, कोकण, माळवा, विद्यराजा मल्ल, चोला, वेंगी इत्यादी प्रदेशावर यशस्वी आक्रमणे केली व तो प्रदेश सोमेश्वर - I ला मिळवून दिला. नागवर्म ने उपरोक्त युध्द मोहिमांचे नेतृत्व केले होते.

राजा सोमेश्वर - I ने नागवर्मच्या पराक्रमावर खुश होऊन त्याचे कौतुक केले. त्यास सेनापती पद दिले. त्यांचे लग्न लावून दिले आणि लग्ननिमित्य त्यास सक्करगे - ८० विभागातील तडखल्लू हे गाव बक्षीस म्हणून दिले. व स्वतः सोमेश्वर-I हा नागवर्मच्या विवाह प्रसंगी उपस्थित होता. तेंव्हा पासून नागवर्म तडखेल परिसरात राहू लागला. नागवर्मचा एक भाऊ होता त्याचे नाव माधव होते. नागवर्मने तडखेलचा भोवताली अनेक देवालयांचे निर्माण केले त्यात -

नारायण, आदित्य, एच्छेश्वर, नागेश्वर, भैरव, मल्लीकार्जुन, सरस्वती, नाग, नंदी, गणेश, सप्तमातृका इत्यादी. जवळपास ५२ देवालयांचे निर्माण केले व ५२ ब्राह्मणांस पुजारी म्हणुन नियुक्त करुन त्यांच्यासाठी घरे बांधून देण्यासाठी जागाही दिली. असा तडखेलच्या शिलालेख क्रं. १ मध्ये उल्लेख आहे.

**२. अग्नी कुल : -** होट्टल येथे आढळलेल्या स्तंभलेखातून होट्टल हे अग्नी कुळाचे मुख्य ठिकाण असावे. हे अग्नी कुळ कल्याणीच्या चालुक्यांचे मांडलिक होते. या घराण्यात धोर, उत्तमा, कालीचोर पहिला, अर्गदेव, कालीचोर -II असे एकापेक्षा एक पराक्रमी सामंत होऊन गेले. या घराण्याच्या अधिपत्याखाली २०,००० खेडी होती. ह्या घराण्यातील धोर याने तर परमार राजा मुंजा याचा पराभव करण्यासाठी चालुक्यांना सहकार्य केले होते. असा उल्लेख होट्टलच्या शिलालेखात आहे.

**३. अनंत पाल : -** नरंगल येथे बाराव्या शतकातील एक शिलालेख सापडला. या शिलालेखात उल्लेख आहे की, चालुक्य नृपती त्रिभुवनमल्ल विक्रमादित्य - VI यांच्या मांडलिकाने स्वतःच्या नावासमोर 'अमरावती पूरवराधिश्वर' ही उपाधी लावली. त्यानुसार चालुक्य राजा विक्रमादित्य- VI (इ.स.१०७६-११२६) चा अधिकारी अनन्तपाल याने इ.स. १०८३ मध्ये पूर्वेकडील वेंगी राज्यावर आक्रमण करुन वेंगी प्रदेश जिंकून घेतला आणि तो कल्याणीच्या चालुक्य साम्राज्यास जोडला. आणि त्याने स्वतःच्या नावासमोर 'अमरावती पूरवराधिश्वर' ही उपाधी धारण केली होती. अनन्तपालने वेंगी विजय मिळवून दिल्यामुळे राजा विक्रमादित्य - VI याने त्यास नरंगलचा परिसर बक्षीस/जहागीर म्हणून दिला होता.

**देगलूर - मध्ययुगीन काळ :-** ख्वाजा मैनुदिन चिस्ती हे इ.स.११९० च्या सुमारास भारतात आले. आणि त्यांच्यानंतर अनेक इस्लामी धर्मप्रचारक भारतात आले. मुहम्मद तुघलक काळात २२ ख्वाजाची

ADAT VYAPARI ... DEGLOOR COLLEGE DEGLOOR Nanded

पालखी खुल्ताबादेत आली. खुल्ताबाद हे दक्षिण भारतातील इस्लामी धर्म प्रचाराचे केंद्र बनले होते. तेथून अनेक ख्वाजा दक्षिण भारताच्या वेगवेगळया विभागात निघून गेले. त्यापैकी शाहचमन रहमतुल्ला आलेह हे कंधारला आहे. त्यावेळी इ.स.१३९८ मध्ये दिल्ली व परिसरावर तैमुरलंगचे आक्रमण झाले. सर्वत्र राजकिय व सामाजिक गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. परिणामी अनेक जन दिल्ली सोडून अन्यत्र निघुन गेले. त्यात मुळचे बल्खचे असलेले रफाई घराण्याचे सय्यदशाह जियाउद्दीन रफाई हे छोटयाश्या फौजेचे प्रमुख होते. ते मजल दरमजल करीत औरंगाबाद मार्गे कंधारला आले. शाहचमन रहमतुल्ला आलेह या सुफी संताच्या सहवासात ते आले. त्यांनी शाहचमन रहमतुल्ला आलेह यांना आपले गरु मानले गुरुंच्या आशीर्वादाने त्यांना उपरती झाली व त्यांनी सर्वसंग परित्याग केला व ते धर्मप्रचारक बनले. आपल्या गुरुंच्या आदेशान्वये जियाउद्दीन रफाई हे देगलूरला आले. सध्याच्या जामा मशिदीत राहायला त्यांनी सुरुवात केली. आणि नंतर ते सध्याच्या दर्गाह परिसरात राहण्यासाठी गेले. जियाउद्दीन रफाई हे देगलूरच्या लोकांमध्ये मिळून-मिसळून राहू लागले. अनेकांना त्यांनी आपले अनुयायी बनविले. जवळपास ३६ वर्ष देगलूर व परिसरामध्ये त्यांचे कार्य चालू राहिले. त्यांना बहमनी राजांकडून २३५ एकर जमीन इनाम म्हणून दिली गेली होती. त्यातून त्यांना भरपूर उत्पन्न मिळू लागले. त्यांनी आपल्या जिवंतपणीच देगलूरच्या पूर्वेकडील दर्गाह बांधवली (८३० फसली). बांधकामासाठी पाणी लागते म्हणुन अगोदरच त्यांनी जवळ बावलीही बांधवली. तेथून दर्गाहच्या खालच्या भागात सरळ जाण्यासाठी एक रस्ता ठेवला होता. म्हणजे जियाउद्दीन रफाई यांनी आपल्या जिवंतपणीच स्वतःची समाधी बांधून घेतली होती. जियाउद्दीन रफाई यांचा रब्बी-उल-आव्वल १५ रोजी म्हणजे इ.स. १४५८ मध्ये देहावसान झाले. आणि दर्गाहच्या खालच्या बाजूला त्यांना सध्याच्या पायऱ्याच्या जागेतून आत नेऊन रीतसर दफन करण्यात आले. आणि तो रस्ता नंतर बंद करून बाहेरून पायऱ्या बांधण्यात आल्या. (ज्या पायऱ्या वरून आपण सध्या चढून जातो.) आणि पुढे रब्बी-उल-आव्वल १५ ह्या दिवशी दरवर्षी दर्गा परिसरात उरूस भरतो. तीन दिवसापर्यंत हा उरूस चालतो. या तीन दिवसाच्या काळात अवलिया, वली यांचे व्याख्यान, कव्वाली, नातीया मुशायरा, गोरगरिबांना अन्नदान इत्यादी उपक्रम चालविले जातात.

दर्गाहच्या प्रवेशद्वारावर एक पितळी पाटी होती असे दर्गाहचे सज्जादा सय्यद अरीफोद्दिन (वय वर्ष ७८) यांनी सांगितले. त्या पितळी पाटी वरील अक्षरे फारसी भाषेत होती. त्याचे अनुवाद मौलाना अबू मंजूर शेख अहमद फाजीले देवबंद यांनी केले असेही त्यांनी सांगितले. त्यात कोठेही जियाउद्दीन रफाइ यांच्यावंशजांचा उल्लेख नसल्याचे त्यांनी म्हटले.

देगलूरच्या दर्गाहचे सज्जादा सय्यद अरीफोद्दिन यांनी मुलाखती दरम्यान म्हटले की, दर्गा विषयीची सविस्तर माहिती 'हयाते वली अल्लाह' या पुस्तकात आहे. पण हे पुस्तक तेलंगणातील निझामसागर जवळच्या टेकमाल येथे एका खेडयात असलेल्या एका मुस्लीम कुटूंबाकडे आहे. तसेच 'अवलिया-ए-दख्खन', 'अवलिया-ए-हिंद' या पुस्तकातही दर्गाह विषयीची सविस्तर माहिती आहे.

देगलूरच्या मुख्य दर्गाहच्या बाहेरील डाव्या बाजूला असलेल्या कबरी ह्या स्त्रियांच्या कबरी आहेत. त्यावर असलेल्या शिळांमधून त्यावर दगडाने वाजविल्यास सा.रे.ग.म.प.ध.नि. चे सप्तसूर निघतात. सज्जादा अरिफोद्दीन सांगतात की, उरुसाच्या काळात कंधारचा नानू कव्वाल हा देगलूरला येत होता आणि त्या शिळांवर सुंदर असे सप्तसूर वाजवत होता. दर्गाहच्या पायऱ्याच्या डाव्या बाजुला असलेली मजार ही जियाउद्दीन रफाई यांच्या मुलांच्या शिक्षकाची आहे. तर पायऱ्याच्या उजवीकडील मजार ही दर्गाह चे बांधकाम करणाऱ्या मुख्य कारागीराची आहे. या शिवाय दर्गाहच्या ओटयावर, दर्गाहच्या समोर, उजवीकडे ज्या कांही कबरो / समाधी आहेत त्या जियाउद्दीन रफाई यांच्या सोबत असणाऱ्या अनुयायांच्या आहेत.

बहमणी राजाकडून जी २३५ एकर जमीन इनाम किंवा दर्गाह च्या व्यवस्थेसाठी म्हणून मिळाली. ते इनाम पुढील काळात येणाऱ्या मुस्लीम शहांनी तसेच कायम ठेवले. उदा. कुतुबशाहा, मोघल, निझाम इत्यादी, त्यापैकी ११७ एकर १२ गुंठे जमीन दर्गाहच्या सज्जादा (दर्गाहचा सेवक) साठी दिलेली आहे. सज्जादाच्या घरातील मोठा मुलगा हा पुढचा सज्जादा असेल असे ठरविण्यात आलेले आहे. देगलूरची दर्गाह इमारत ही जवळपास तीन एकरात व्यापलेली आहे.

मुर्तूजा शाहवली मजारचे सज्जादा सय्यद अलीशा यांनी मुलाखती दरम्यान सांगितले की, पुढे इ.स.च्या १८ व्या शतकात म्हणजे मीर निजाम अली खान आसफजाह (इ.स. १७६२-१८०३) या हैद्राबादच्या निजाम काळात मस्तानशाह वली, मुर्तूजा शहावली, आणि हजरत शेख हैदर रहमतुल्ला आलेह हे देगलूरला आले आणि परिसरात वावरु लागले. यातील मस्तान शाह वली आणि चूडामणी महाराज यांच्यात चांगलेच मैत्रीपूर्ण संबंध निर्माण झाले. मुर्तूजा शाहवली आणि गुंडा महाराज यांचेही चांगले संबंध होते असे सांगितले जाते. गुंडा महाराजांना (इ.स. १७५३-१८१८) 'सद्गुरु' म्हणत तर मुर्तूजा शाहवलीला 'सरगुरु' असे म्हटले जात होते. म्हणून मस्तान शाहवली याची मजार चूडामणी महाराजांच्या मठासमोर आहे तर मुर्तूजा शाहवली याची मजार गुंडा महाराजांच्या मठासमोर आहे. यातील मुर्तूजा शाह वली हे नाडबंद (ब्रह्मचारी, मांसाहार चालत नाही) होते. तर मस्तान शाहवली हे अंगावर खमीज नेसत नव्हते. मुर्तूजा शाहवली यांच्या मजारीची देखभाल (खिदमतगार) सय्यद अलिशा हे सध्या करीत आहेत. त्यांचे वय ७६ वर्ष आहे. यातील हजरत शेख हैदर रेहमतुल्ला आलेह यांची मजार देगलूरातील सध्याच्या इदगाह समोर आहे. असे सांगितले जाते की, त्यावेळी कोणतीतरी रथ मिरवणूक आली होती. तेंव्हा काहीसा संघर्ष
झाला आणि त्यांनी ईदगाहच्या समोर येऊन मोहरम ९ या रोजी त्यानी जिवंत समाधी घेतली. काहीजण म्हणतात की ते शहीद झाले.

**श्री संत चुडामणी महाराज :-** देगलूरचे चूडामणी महाराज एक परम साक्षात्कारी संत पुरुष होते. ते महान योगी व भगवतभक्त होते. नाथपरंपरेतील ते असल्यामुळे योग आणि भक्ती दोन्हीही त्यांना साध्य होते. संत ज्ञानेश्वरांनी देवनाथ यांना साक्षात्कारांने उपदेश केला. त्याच देवनाथाचे चूडामणी महाराज हे शिष्य होते. श्री चूडामणी महाराज यांच्याकडे अनेक विद्यार्थी वेद, व्याकरण, पुराणे, संगीत इत्यादी

184



शिकण्यासाठी येत होते. चुडामणी महाराजांचेच शिष्य म्हणजे गुंडामहाराज होते.

**श्री संत गुंडा महाराज :-** गुंडा महाराजांचा जन्म शके १६७५ (इ.स.१७५३) मध्ये झाला. त्यांचे पूर्वज महीपती नाईक, हैबती नाईक, तिमाजी नाईक हे सराफा व्यापारी होते, श्रीमंत सावकार होते. ते नाथ संप्रदायाचे होते. चुडामणी महाराजांच्या सहवासात गुंडा महाराज आले आणि त्यांना वैराग्य प्राप्त झाले. विठ्ठलाच्या भक्तीत ते रंगत चालले होते. अनेकदा ते पांडूरंगाच्या भजनात देहभान विसरुन नाचत असत, विठ्ठल भक्तीत मग्न होत असत त्यातूनच त्यांच्या प्रसिध्द चक्री भजनाची निर्मिती झाली. ज्ञानेश्वरी ग्रंथाची त्यांनी उपासना केली. त्यांनी सतत अन्नदान, ज्ञानदानाचे कार्य केले. परिणामी त्यांचा लौकिक सर्वदूर पसरला. हैद्राबाद संस्थानचा दिवाणी चंदुलाल व रायरायन्ना बहादूर हे त्यांच्याच संप्रदायातील होते. पेशवा बाजीराव दुसराचा सेनापती बापू गोखले हा सुध्दा कधी कधी गुंडा महाराजांच्या चक्री भजनात मागे वीणा घेवून उभा राहत होता असे सांगितले जाते.

श्री गुंडा महाराज यांनी भागवत धर्माचा प्रचार-प्रसार सर्वदूर केला होता. औसा, कुश्तापूर, रेगोडयरपल्ली, आदलाबाद, तीकोटे (विजापूर), श्रीगोंदे इत्यादी ठिकाणी भागवत धर्माची केंद्रे त्यांनी स्थापन केली. त्यांचे अनुयायी शिष्य - प्रशिष्य आजही आपापल्या क्षेत्रात भागवत धर्माचे कार्य करीत आहेत. तेलंगणा भागातही त्यांनी भागवत धर्म प्रचार-प्रसार केला. शेवटी इ.स.१८१८ मध्ये त्यांनी पंढरपूर येथे जिवंत समाधी घेतली.

**श्री संत गुंडा महाराज मठ :-** गुंडा महाराजांच्या स्मरणार्थ देगलूरात बांधलेला मठ जवळपास २०० वर्ष जुना आहे. मठाचे बांधकाम दगडी शिळांचे असून वर घुमटाकार आहे. मठात मुख्यत: तीन गाभारे आहेत. त्या तीन गाभाऱ्यात ज्या मूर्ती आहेत त्या बद्दलची अशी कथा सांगितली जाते.

मठातील उजवीकडच्या पहिल्या गाभाऱ्यात देवी सरस्वतीची प्रतिमा आहे. काळयाभोर पाषाणात कोरलेल्या या मूर्तीची चकाकी आजही कायम आहे. त्या मूर्तीचे कोरीव काम अप्रतिम आहे. ही मूर्ती चार हाताची असून पद्मासनात बसलेली आहे. मूर्तीचा खालचा उजवा हात अभय मुद्रेत आहे. उजव्या हातात अक्षमाला तर वरच्या डाव्या हातात पुस्तक धारण केले आहे. खालचा डावा हात वरदहस्त मुद्रेत आहे. मूर्ती सालंकृत आहे तिने करंडक मुकूट, माला, रत्नकुंडले, कटिबंध, उदरबंध, कंकण, केयूर धारण केलेले आहेत. या देवी सरस्वती शिल्पावर चालुक्य-होयसळ शिल्पशैलीचा प्रभाव दिसतो. म्हणजे ती चालुक्य कालीनच आहे.

एकदा एक गोसावी राम, लक्ष्मण आणि सीता यांच्या मूर्ती घेवून जात होता. तो देगलूरला आला असता त्या मूर्ती त्यांने गुंडा महाराजांकडे देण्याबद्दल त्यास दृष्टांत झाला. त्यानुसार त्याने त्या तीन प्रतिमा गुंडा महाराजांच्या स्वाधीन केल्या. त्या मूर्तीची मठाच्या दुसऱ्या गाभाऱ्यात प्रतिष्ठापना केली आहे. तर तिसऱ्या गाभाऱ्यात विठ्ठल - रखूमाईच्या मूर्तीची प्रतिष्ठापणा करण्यात आली आहे.

**देगलूर - आधुनिक काळ :** इ.स. १८८९ मध्ये पेठअमरापूर हे खेडे देगलूर मध्ये विलीन करण्यात आले. देगलूरची ग्रामदेवता परमेश्वर म्हणून होती. त्याची मूर्ती व देऊळ आजही बैराग्याच्या मठात आहे. या ग्रामदेवतेची पुष्करणी म्हणजे समोर एक तळे होते. जी आज तळगल्ली बनली. परमेश्वर देवतेची प्रतिमा उभ्या पध्दतीत आहे. त्या प्रतिमेची उंची ४.५ फुट आहे. परमेश्वर देवतेच्या मस्तकाच्या डाव्या बाजूस स्त्री चेहऱ्याची प्रतिमा कोरलेली आहे. म्हणजे निश्चितच तो शिव किंवा अर्धनारी नटेश्वर आहे.

देगलूरच्या चारही वेशीवर चार 'वेसकर' होते. वेशींची संपूर्ण व्यवस्था ते पाहत होते. वेसकरांना त्या वेशीतून गावकऱ्यांकडून धान्यरुपात बलुते मिळत होते. त्यांना कसलाही सरकारी पगार नव्हता. तर गावातील सर्व सरकारी कामे 'पाडेवार' सांभाळीत होते. पाडेवारांना संपूर्ण गावातून बलुते मिळत होते. हे बलुते कणसासहित पेंडयाचे होते. यालाही कोणत्याच प्रकारचा सरकारी पगार नव्हता. गावातील राजस्व वसुलीचे काम पोलीस पाटलाच्या सहाय्याने पटवारी करीत होता. पोलीस पाटलास त्याकाळी 'कोतवाली पाटील' ही म्हणत होते. गावांत शांतता व सुव्यवस्था राखण्याचे काम पोलीस पाटलांचे होते. गावातील पोलीस पाटील व माली पाटील यांना पटवाऱ्याच्या निम्मे-निम्मे वेतन मिळत होते.

गावात एक शेटकार होता तो बाहेरुन गावात येणाऱ्या शेतीमाल, व्यापारी मालाचे वजन-माप मोजण्याचे काम करीत होता. शेटकार हाच तत्कालीन गावचा वजन-मापे प्रमुख होता.

गावातील प्रत्येक जातीचा एक-एक मेहेत्री होता तो आपापल्या जातीचे सर्वच कार्यक्रम, जबाबदाऱ्या सांभाळीत होता. जातीतील लहान मोठे तंटे तोच सोडवीत होता. त्याला केवळ मान होता धन मिळत नव्हते. एखादेवेळी जाती-जातींमध्ये तंटा-वाद झाला किंवा गंभीर अपराध घडला तर असे प्रकरण चावडीवर येत होते. देगलूरात दोन चावडया होत्या. एक चावडी जुम्मामशिदीसमोर होती तर दुसरी पेठअमरापूरची चावडी ही बालाजी झेंडयासमोरील चौरस्त्यावर होती. याच चावडयावर दोन्ही पाटील, पटवारी, मेहेत्री व गावातील प्रतिष्ठीत लोकांच्या सल्ला-मसलतिने गंभीर खटले मिटवले जात होते.

प्रशासकीय सोयीसाठी देगलूरच्या तीन तरफा (विभाग) होत्या. त्यावर तीन देशमुख व तीन देशपांडे नियुक्त करण्यात आले होते.

१. तरफे अव्वल खानापूर :- त्यावर देशमुख म्हणुन मराठा घराणे होते तर देशपांडे म्हणून गोपाळरावजी देशपांडे यांचे पूर्वज काम पाहत होते.
२. तरफे दुव्वम कसबे देगलूर :- याचे देशमुख सय्यद देशमुख होते. तर देशपांडे म्हणून नरसिंगराव देशपांडे यांचे पूर्वज होते.
३. तरफे नरंगल :- याचे देशमुख नरंगलकर देशमुख होते तर देशपांडे म्हणून शेषेराव देशपांडे यांचे पूर्वज होते.

मानधन म्हणून देशमुखाला ५% रुसूम होते तर देशपांडयास २.५% रुसुम होते.

एकदा मराठा देशमुखाने महसुलीचा भरणा व्यवस्थित न भरल्यामुळे निजामाने त्यास काढून टाकले त्याच्या गढीवर कब्जा केला आणि त्याच्या जागी कंधारचा रिसाल्याचे (गाव पहारेकरी) काम करणाऱ्या सिद्दी यांना आणून बसविले ते घराणेच म्हणजे सिद्दी समदानी देशमुख घराणे होय.

देगलूरमध्ये न्यायालय नव्हते म्हणून देगलूरच्या लोकांना मुखेड-कंधार येथील न्यायालयात जावे लागायचे. म्हणून हळूहळू देगलूरात अनेक शासकीय कार्यालयांची निर्मिती व्हायला सुरुवात झाली ती पुढीलप्रमाणे --

इ.स. १८९० मध्ये सध्याच्या (बंडागल्ली) शासकीय कन्या विद्यालयाच्या जागी तहसील सुरु झाले.

इ.स. १९०५ पासून बशीर हसनच्या जागेत न्यायालय सुरु झाले.

इ.स. १९१० मध्ये चौथीपर्यंत प्राथमिक शाळा सुरु झाली. तर १९२० मध्ये मिडलस्कुल सुरु झाले

इ.स. १९२४ मध्ये पोस्ट ऑफिस आहे त्याच जागी सुरु झाले.

इ.स. १९३३ पासून न्यायालयाची स्वतंत्र्य इमारत बांधली गेली. जी सध्या आहे.

इ.स. १९३९ साली डिव्हिजन ऑफिस झाले मुधोळ, देगलूर, कंधार, बिलाली हे तालुके त्या अंतर्गत आणले. आणि पुढे देगलूरचा शैक्षणिक विकास होतच राहिला.

अशाप्रकारे देगलूरचा हा गतकाळचा इतिहास थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न केला आहे. हा इतिहास संकलित करण्यासाठी मी स्वत: देगलूरच्या अनेक भागात फिरलो, पाहणी केली, सर्वेक्षण केले, अनेकांच्या मुलाखती घेतल्या. दर्गाह परिसरात आम्ही तेथील वयोवृध्द असलेल्या सज्जादा सय्यद अरीफोद्दीन (वय ७८ वर्ष) यांची मुलाखत घेतली मुर्तूजा शाहवलीचे खिदमतगार सय्यद अलिशा (वय वर्ष ७६) या वयोवृध्द व्यक्तीची मुलखात घेतली. आणि गुंडा महाराज मठात जावून आम्ही श्री गहिनीनाथ महाराज देगलूरकर (वय वर्ष ८६) यांची मुलाखत घेतली याशिवाय खालील ग्रंथाचा - पुस्तकांचा आधार घेवून उपरोक्त माहिती संकलित करण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ ग्रंथे :**


१. नांदेड जिल्हा गॅझेटीअर - संपादक, अरुणचंद्र शं. पाठक
२. देगलूर : विविध दर्शन - संपादक, प्रा.सर्जेराव रणखांब
३. श्री गुंडा महात्म्य - प्रकाशक, चंदशेखर एकनाथ महाराज देगलूरकर
४. प्राचीन भारत का इतिहास - व्ही.डी.महाजन
५. सुलतान महम्मद कुतूबशाह - प्रकाशक, परवेझ खान, हैद्राबाद
६. हाईटेक हैद्राबाद गाईड (पुस्तक)
७. देगलूर महाविद्यालय, अभिव्यक्ती, - अंक २ रा, वर्ष २ रे, संपादक - प्रकाश जोशी
८. सज्जादा सय्यद आरिफोदीन, वय ७८ वर्ष यांची प्रत्यक्ष स्थळी घेतलेली मुलाखत (रफाईउद्दीन दर्गाहचे मुख्य पुजारी)
९. प्रा.डॉ.शेख जुबेर यांची प्रत्यक्ष मुलाखत
१०. श्री गहिनीनाथ महाराज देगलूरकर यांची प्रत्यक्ष मुलाखत
११. खिदमतगार / सज्जादा सय्यद अलिशा (वय वर्ष ७६) यांची प्रत्यक्ष मुलाखत
१२. Inscription form Nanded District (New १९६८) - D.C.Sarkar and G.Bhattacharya
१३. Epigraphia Indica Vol XXXV, Part IV, Oct.१९६३, (Delhi-१९६३)


❑❑❑

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded